स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मराठी विषयातील पीएच्.डी. पदवीसाठी सादर केल्या जाणाऱ्या शोधप्रबंधाची स्थूल रुपरेषा

: संशोधन विषय :

“२१ व्या शतकातील वडार आत्मकथनातील समाजजीवन : एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक
श्रीकांत मरगू मुद्दे
एम.ए.,बी.एड,एम.फिल.,सेट (मराठी)

मार्गदर्शक
प्राचार्य डॉ.आशा मुंडे
मराठी विभाग प्रमुख
श्रीमती सुशीलादेवी देशमुख महिला महाविद्यालय,
लातूर-४१३५१२

संशोधन केंद्र

दयानंद कला महाविद्यालय, लातूर

एप्रिल-२०१९

प्रस्तावना

मराठी साहित्यातील कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या वाङ्मयप्रकारापेक्षा 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार अत्यंत लोकप्रिय आहे. कारण 'आत्मकथन' हा मानवी जीवन आणि त्याच्या व्यथा, वेदनांचा दर्शन घडविणारा, समाजजीवनाचा वेध घेणारा, भोगलेल्या आणि जगलेल्या जीवनाची सखोलता प्रतिबिंबीत करणारा, विविध प्रश्नांची चिकित्सा करणारा, उद्बोधन, प्रबोधन करणारा आणि संपूर्ण मानवी जीवनाला कवेत घेणारा वाङ्मयप्रकार आहे.

१९६० नंतर मराठी साहित्यात ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, जनवादी या साहित्याबरोबरच 'दलित साहित्याचाही प्रवाह' नावारूपाला आला. या दलित साहित्यामध्ये माणूस केंद्रीभूत मानून येथील शोषित, पीडित माणसांचे, त्यांच्या जगण्याचे, त्यांच्या राहणीमानाचे, रूढी, प्रथा, परंपरा, चालिरीती, अंधश्रध्दा आणि त्यांना भेडसावणाऱ्या विविध प्रश्नांचे वास्तव चित्रण दलित लेखकांनी आणि भटक्या विमुक्त जमातीतील लेखकांनी आपल्या अनुभवाच्या व प्रतिभेच्या बळावर शब्दांकित केलेले आहे. त्याचाच परिपाक मराठी दलित आत्मकथनातून व्यापक जीवनाचा आशय आविष्कृत झाला आहे.

१९६० नंतरच्या मराठी दलित-भटके-विमुक्त आत्मकथनातून भटकंती करणाऱ्या समुदायातील त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींचे दुःख, त्यांचे दारिद्र्य, त्यांची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, भौतिक परिस्थितीचे वास्तव चित्रण मुखर झाल्याचे दिसून येते. आज जग झपाट्याने बदलत आहे. परंतु अद्यापी या बदलाचे वारे या भटक्या-विमुक्तांपर्यंत पोहोचलेले दिसून येत नाहीत, अद्यापही त्यांच्या राहणीमानात फारसा फरक पडलेला दिसत नाही. नवी अर्थव्यवस्था, पाश्चात्य संस्कृती व शिक्षण, औद्योगिकीकरण, नागरिकरण, जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण, दळणवळणात झालेली वाढ, सामाजिक सूरक्षेचे नवीन कायदे, स्त्री सक्षमीकरण, राज्याचे नवीन कायदे या विविध कारणांमुळे भटक्या-विमुक्तांच्या जगण्यात फारसा फरक पडलेला दिसून येत नाही. उलट जागतिकीकरणामुळे भटक्या-विमुक्त समुदायाचा व्यवसाय हा मोडकळीस आला. हा परिघाबाहेरील घटक स्वातंत्र्योत्तर तरी परिघाच्या आत येईल असे वाटले होते परंतु स्वातंत्र्योत्तर काळातही हा घटक भटकंतीच करताना निदर्शनास येतो आहे.

तद्नंतरच्या काळात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या समर्थ नेतृत्वाने अस्मिता जागृत झालेला, आजवर दबलेला दलित, शोषित, पीडित, भटकंती करणारा वर्ग लिहू लागला आणि मराठी साहित्यात एका नव्या पर्वाला सुरूवात झाली. आजवरच्या कोंडमाऱ्याचा तीव्र उद्रेक झाला आणि पेटत्या विस्तवातल्या निखाऱ्यागत अवघ्या मराठी साहित्यावर त्याच्या आवेगाचा प्रकाश पसरला. यासंदर्भात अभ्यासकाने उपलब्ध माहितीच्या आधारे आपले विवेचक विचार मांडले आहेत.

दोन हजारोत्तर भटक्या-विमुक्त वडार आत्मकथनातून आलेल्या सामाजिक जीवनमूल्यांचे प्रकर्षाने दर्शन होते. त्यात साधारणतः स्वातंत्र्य, समता, बंधुता, सामाजिक न्याय तसेच सामाजिक विषमतेचे दर्शन दोन हजार नंतरच्या आलेल्या भटक्या-विमुक्त वडार आत्मकथनातून याचे चित्रण आलेले दिसून येते. तसेच दया, क्षमा, शांती, प्रज्ञा, शील, करूणा याही जीवनमूल्यांचे वास्तविक जीवन चित्रण या वडार आत्मकथनातून आलेले दिसून येते.

मनुष्य हा समाजशील प्राणी असल्यामुळे व्यक्ती व समाज यांचे नाते अतूट आहे. माणूस हा समाजात राहिल्याशिवाय आपला सर्वांगीन विकास करू शकत नाही. याचे कारण सुरूवातीच्या काळामध्ये भटक्या अवस्थेत जीवन जगणारा माणूस आपल्या दैनंदिन गरजांच्या पूर्ततेसाठी टोळ्यांनी किंवा समूहाने राहू लागला. यातूनच नंतर 'समाजाची' निर्मिती झालेली आहे. या समाजामध्ये अनेक संस्थाची निर्मिती झाली. त्यापैकीच 'कुटुंबसंस्था' ही एक महत्त्वपूर्ण व संस्कारशील संस्था म्हणून ओळखली जाते. कारण कुटुंबसंस्थेद्वाराच प्रत्येक व्यक्तींवर, बालकांवर संस्कार होत असतात. म्हणूनच मानवी जीवनामध्ये कुटुंबसंस्थेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. हे लक्षात घेऊन भटक्या-विमुक्त समुदायाचे त्यांच्या विदारक जगण्याचे, जीवनाचे चिंतन अभ्यासकाने साहित्यकृतींच्या आधारे करण्याचा निर्धार केला आहे.

भूमिका

मराठी वाचकाला एका नव्या अनुभव विश्वात नेऊन सोडणारे साहित्य म्हणजे भटक्या-विमुक्तांचे साहित्य होय. मराठी साहित्यातील दलित-व भटके-विमुक्तांचा हा साहित्याचा प्रवाह हा एक मध्यवर्ती प्रवाह आहे. आजच्या मराठी साहित्याला दलित साहित्याने भरीव असे योगदान दिले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात मराठी साहित्याच्या कक्षा विस्तीर्ण झाल्या. दलित-भटक्या-विमुक्त माणसांचे जीवन, त्यांचे दुःखानुभव साहित्याचा विषय होऊन वास्तव असे अनोखे भावविश्व साहित्यातून आविष्कृत होऊ लागले. ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, आदिवासी, मुस्लिम, जनवादी,

भटके-विमुक्त इ. माणसांच्या जीवन चित्रणामुळे या साहित्याचे स्वतंत्र वाङ्मय प्रवाह निर्माण झाले. त्यापैकीच दलित साहित्य प्रवाह हा अत्यंत महत्त्वाचा साहित्य प्रवाह म्हणून स्थिर झाला आहे.

आधुनिक मराठी साहित्यात नव्या वाङ्मयप्रवाहाचे साहित्य हे महात्मा ज्योतिबा फुले, राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर,कार्ल मार्क्स यांच्या विचार व प्रेरणेतून निर्माण झालेले आहे. दलित साहित्य चळवळीला या विविध समाजसुधारकांचा, त्यांच्या विचारधारांचा वारसा लाभला आहे. दलित आणि भटके-विमुक्त समाजातून आलेला लेखक हा या संस्कृतीतून या मातीतून वाढला, घडला आहे. शिक्षणाच्या विकासाबरोबर साहित्याच्या वाचनातून, अभ्यासातून तो आपले स्वतःचे अनुभव जपणे, लेखकाने केलेले निरीक्षण, ज्या जीवनविश्वात तो राहतो, त्या जीवनाचे यथार्थ चित्रण मराठी दलित-भटके-विमुक्त आत्मकथनातून केले गेले. जे पाहिले, अनुभवले ते आपले जगणे वास्तवाच्या पातळीवर चित्रित करावे म्हणून अनेक साहित्यिकांनी वास्तववादी विचाराच्या अनुभवातून विविध साहित्यकृतींची निर्मिती केलेली आढळते.

भटके-विमुक्त जीवन, त्यांची संस्कृती, त्यांच्या पदरी आलेले पिढ्यानपिढ्यांचे दारिद्र्य, दुःख, पिढ्यानपिढ्यांची भटकंती याबरोबरच भटके-विमुक्त जीवन, तेथील संस्कृती, त्यांची भाषा, येथील माणसांचे स्वभावविशेष, चालिरीती, रूढी, प्रथा, परंपरा, जीवनसंकेत, तेथील कौटुंबिक जीवन, कुटुंबाचे प्रश्न, त्यांच्यातील ताणतणाव, मानवी जीवनात होणारे अनेक खदल-बदल, बदलत्या आधुनिक जीवनशैलीचे आधुनिक ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाचे, शिक्षणाचे परिणाम दलित व भटके-विमुक्त साहित्यावर झालेले दिसून येतात.

मराठी दलित साहित्यात सर्वच वाङ्मयप्रकारांमध्ये खूप मोठ्या प्रमाणात लेखन झाले असून सद्यःस्थितीतही नव्या पिढीतील नव्या दमाचे उमदे, तरूण लेखक दलित व भटके-विमुक्त जमातीतील विविध समस्यांवर साहित्याच्या माध्यमातून आपले विचार प्रकट करीत आहेत. मराठी दलित आत्मकथनाची निर्मिती ही व्यापक अशा स्वरूपात झाली असून या विविध कलाकृतीतून व्यक्त झालेल्या भटक्या-विमुक्तांच्या बदलत्या वास्तव जीवन चित्रणाचा अभ्यास शोध आराखड्याच्या लेखनासाठी महत्त्वाचा वाटतो.

अशा प्रकारे प्रस्तुत शोध आराखड्याची मांडणी करण्याचे योजिले आहे.

संशोधन विषयाच्या अभ्यासाचा उद्देश

१. भटक्या-विमुक्त साहित्याचे आणि या विविध जाती-जमातीतून आलेल्या आत्मकथनांचे

स्वरूप समाजावून घेणे.

२. भटक्या-विमुक्त वडार जमातीतील आत्मकथनातून आलेले, भटकंती करणाऱ्या वडार जमातीचे स्वरूप आणि एकूणच समाजजीवन यांचा शोध घेणे.

३. वडार आत्मकथनातून आलेले वाङ्मयीन जीवनजाणिवांचा शोध घेणे.

४. भटक्या-विमुक्त वडार आत्मकथनातून आलेल्या स्त्री प्रतिमांचे चित्रण याचा अभ्यास करणे.

५. वडार जमातीत असलेल्या जातपंचायतीचे स्थान समजावून घेणे.

६. आत्मकथनातून आलेल्या वडार बोलीभाषेचे स्वरूप आणि वेगळेपण याचा शोध घेणे.

७. वडार जमातीसमोरील समस्या आणि करावा लागणारा जीवनसंघर्ष याचा आत्मकथनाच्या आधारे शोध घेणे.

८. विविध सामाजिक चळवळी, विचारधारा यामुळे साहित्यनिर्मितीवर कोणता परिणाम झाला ते सांगणे.

एकूणच दोन हजारोत्तर भटक्या-विमुक्त वडार जमातीतील आत्मकथनातून आलेल्या वडार जमातीची स्थिती गती, स्त्रियांची वास्तव स्थिती शोधणे, निर्माण झालेल्या समस्यांचे उकल करून त्यांच्या जीवनसंघर्षाचे, एकूणच त्यांच्या समाजजीवनाचे चिकित्सक अभ्यास करणे हा या संशोधनामागील हेतू आहे.

संशोधनाचे महत्त्व

संशोधनामध्ये प्रत्यक्ष कृतीशील संशोधनाला आणि वास्तविक सामाजिक जीवनमूल्यांना अत्यंत महत्त्वपूर्ण मानले जाते. प्रस्तुत शोध आराखड्यातून भटक्या-विमुक्त वडार जमातीतील आत्मकथनातून आलेल्या सामाजिक आणि जीवनमूल्ये यांचा अभ्यास केला जाणार आहे. या माध्यमातून उपेक्षित म्हणून जीवन जगणारी भटक्या-विमुक्तातील वडार जमातीतील माणसे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय पातळीवर आजही उपेक्षित आहेत. त्यांचे आत्मकथनातून येणारे वास्तविक चित्रण व जीवन त्यांच्यातील अज्ञान, अंधश्रध्दा, रूढी, प्रथा, परंपरा चालिरीती यांचा विविध अंगाने अभ्यास करून नवीन निष्कर्ष मांडणे हे या शोध प्रबंधात महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या अनुषंगाने भटक्या-विमुक्त वडार जमातीतील सामाजिक जीवन व त्यांच्या जीवनमूल्यांचा अभ्यास प्रस्तुत विषयाच्या अंगाने मांडला जाणार आहे.

संशोधनासाठी प्रकरणनिहाय विभागणी

प्रकरण पहिले	-	भटक्या-विमुक्तांचे साहित्य आणि आत्मकथनाची संकल्पना
प्रकरण दुसरे	-	वडार जमातीची समाजसंस्कृती आणि स्वरूप
प्रकरण तिसरे	-	आत्मकथनातून आलेला वडार समाज आणि व्यक्तिचित्रणे
प्रकरण चौथे	-	वडार आत्मकथनातील स्त्री जीवनाचे स्वरूप
प्रकरण पाचवे	-	आत्मकथनातून आलेल्या वडार समाजाच्या समस्या, जीवनसंघर्ष आणि वाङ्मयीन मूल्यमापन
प्रकरण सहावे	-	निष्कर्ष आणि उपसंहार

प्रकरण पहिले

भटक्या-विमुक्तांचे साहित्य आणि आत्मकथनाची संकल्पना

आत्मकथन हा एक लोकप्रिय वाङ्मयप्रकार आहे. वाङ्मयाच्या विविध प्रकाराहून आत्मकथनाची प्रकृती ही मुळातच भिन्न आणि व्यापक स्वरूपाची व अवकाशाला कवेत घेऊन समग्र जीवनाचे प्रतिबिंब ती आत्मसात करू शकते. मराठी साहित्यात दलित आणि भटक्या-विमुक्तातील आत्मकथनाने आपले स्वत:चे वेगळेपण निर्माण करून आत्मकथन या वाङ्मयप्रकारात जे एक महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे ते कसे? याचा यथार्थ मागोवा प्रस्तुत प्रकरणात संशोधक घेणार आहे.

'आत्मकथन' या वाङ्मयप्रकाराची संकल्पना सुस्पष्ट करण्याबरोबर अनेक अभ्यासकांनी आत्मकथनाच्या ज्या व्याख्या सांगितल्या आहेत. त्याचा आधार घेऊन 'आत्मकथन' या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप कसे आहे. ते सांगण्याबरोबरच दलित-भटके-विमुक्त आत्मकथनाचे वेगळेपण विशद करून सांगण्याचा प्रयत्न अभ्यासक करणार आहे. आत्मकथन वाङ्मयाच्या उगमापासून आत्मकथनातून आलेले प्रत्यक्ष जीवनवास्तव कसा चित्रित झाला आहे. याचाही यथार्थ मागोवा घेऊन कादंबरीच्या वाटचालीचे स्वरूप विशद करणार आहे.

प्रकरण दुसरे

वडार जमातीची समाजसंस्कृती आणि स्वरूप

मानव आणि समाज यांचे अतूट नाते आहे. मनुष्य हा समाजाशिवाय जीवन जगू शकत नाही, स्वत:ची प्रगती करू शकत नाही. सामाजिक संघटनांचे जाळे म्हणजेच समाज होय. सामाजिक विविध संस्थापैकी मानवी जीवनासाठी अत्यावश्यक, प्रत्येकावर संस्कार करणारी, कुटुंबसंस्था ही अनन्यसाधारण सामाजिक संस्था आहे.

१९६० नंतरचा कालखंड मराठी साहित्याच्या संदर्भात अनेक दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. कारण या कालखंडामध्ये एकूणच समाजव्यवस्थेमध्ये आमूलाग्र परिवर्तन होऊ लागले. दलित भागामध्ये शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला. दलित माणूस शहराकडे कामाच्या, उद्योग, व्यवसायाच्या निमित्ताने स्थलांतर करू लागला. या अनुषंगाने त्याचे सामाजिक जीवन आणि जीवनमूल्यांचा तद्वतच वडार समाज आणि त्याचा व्यवसाय, त्यांची संस्कृती, त्यांच्या आजच्या स्थिती गतीचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणातून करण्याचे योजिले आहे.

प्रकरण तिसरे

आत्मकथनातून आलेला वडार समाज आणि व्यक्तिचित्रणे

आजचे जग झपाट्याने बदलत आहे. त्यामुळे वडार समाजाच्या राहणीमानातही बदल होत आहे. म्हणजेच पारंपरिक कुटुंब आणि आधुनिक कुटुंब यामध्ये फरक असलेला दिसून येतो. त्यांच्यात सामाजिक जीवनमूल्यांची रूजवणूक करून त्यांच्या सामाजिक जीवनाविषयीच्या जीवनमूल्यांची चित्रण करणे, त्यांच्या जगण्याची परवड, त्यांचा जीवनसंघर्ष, त्यांची जगण्यासाठी चाललेली धडपड याचा अभ्यास इ. हे आलेले विविध व्यक्तिचित्रणे वडार आत्मकथनाच्या आधारे अभ्यासकाने याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्याचे ठरवले आहे.

प्रकरण चौथे

वडार आत्मकथनातील स्त्री जीवनाचे स्वरूप

वडार जमात ही कायम उपेक्षित, वंचित समाज व सतत भटकंती करत उदरनिर्वाह करत जगणारा जमात व इतर सोयी सुविधांपासून वंचित असणारा घटक आहे. त्यातल्या त्यात वडार स्त्री जीवन, तिचा जगण्यासाठी चाललेला संघर्ष, त्यांच्यामध्ये असलेल्या वेगवेगळ्या परंपरा, रितीरिवाज, त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धती आणि दलितापेक्षाही दलित जीवन जगणारी वडार स्त्री, शिक्षणाचा गंध नसणारी स्त्री, तिच्या आयुष्यात आलेले जीवघेणे संघर्ष, समाजातील शिक्षणाचा अभाव इ. मुळे होणारा कोंडमारा या दृष्टीने प्रस्तुत प्रकरणातून अभ्यास करण्याचे ठरवले आहे.

प्रकरण पाचवे

आत्मकथनातून आलेल्या वडार समाजाच्या समस्या, जीवनसंघर्ष आणि वाड्मयीन मूल्यमापन

मराठी साहित्यामध्ये दलित आणि भटक्या-विमुक्तांच्या साहित्यातील 'आत्मकथन' हा वाङ्मयप्रकार आता स्थिर झाला असून विविधांगी प्रभावी असे दर्शन मराठी दलित आणि भटक्या-विमुक्तांच्या आत्मकथन या वाड्मय प्रकारातून प्रतिबिंबीत झाले आहे. वडार आत्मकथनातून आलेला समाज, त्यांचे प्रश्न, समस्या, जीवन जगण्यासाठी चाललेली जीवघेणी परवड, त्यावरील उपाय इ. एकंदरीत, वडार समाजजीवनाचा समग्र जीवनपट मांडण्यासाठी अत्यंत कौशल्याने, आपल्या प्रतिभेने पाहिलेले, वास्तवाभिमुख जीवनानुभव, त्यांच्यातील ताणतणाव, वैमनस्य,

व्यावसायिक, पुढारी, आलुतेदार, बलुतेदार, गावचा सुशिक्षित युवक, वडार स्त्रीचे जगणे, भोगणे, तिचे दुःख, दैन्य, दारिद्रय या सर्वांगाना स्पर्श करणारे आत्मकथनातून आलेले वडार जमातीचे यथार्थ चित्रण साहित्यिकांनी कलाकृतींच्या माध्यमातून केले आहे. याचाच अभ्यास प्रस्तुत प्रकरणातून करण्यात येणार आहे.

मराठी भटक्या-विमुक्त वडार आत्मकथनातून आलेल्या सामाजिक जीवन चित्रणाचे वाङ्मयीन मूल्यमापन करण्यासाठी प्रस्तुत अभ्यास विषयाच्या अनुषंगाने अभ्यासकाला ज्या सामाजिक जीवन-जाणिवा निदर्शनास आल्या त्या प्रत्येक कलाकृतीतून ज्या संवेदना, भावना, जाणिवा व विचार लक्षात घेऊन वडार आत्मकथनातून समाजजीवनातील विविध अंगाने आवश्यक ते चिंतन, मनन, विचार करून आपले अभ्यासपूर्ण मत मांडण्याचा यथोचित प्रयत्न केला जाणार आहे.

प्रकरण सहावे :

उपसंहार आणि निष्कर्ष

उपसंहार हे प्रकरण अभ्यासकाने तयार केलेल्या शोधप्रबंधाच्या आधारे असून ते एकूण सहा प्रकरणाच्या आधारे मांडण्यात येणार आहे. प्रत्येक प्रकरणातून मांडलेल्या विचारांचा यथार्थ परामर्श घेऊन यथातथ्य असे मुद्देसुद नेमके विचार उपसंहारातून मांडले जातील.

एकंदरीत शोधप्रबंधामध्ये प्रत्येक प्रकरणामध्ये केलेले संशोधन व त्या संशोधनाअंती काढलेले निष्कर्ष यांची मांडणी या प्रकरणात केली जाणार आहे.

परिशिष्ट

परि.१. मूळ आधारभूत ग्रंथसूची

संदर्भ

१. संदर्भ ग्रंथसूची

२. प्रातिनिधिक मुलाखती

३. नियतकालिक, वृत्तपत्रे इ.

परिशिष्ट (अ)

मूळ आधारभूत ग्रंथसूची :

अ.क्र.	आत्मकथनाचे शीर्षक	लेखकाचे नाव	प्रकाशन वर्ष
१.	दगडफोड्या	रामचंद्र नलावडे	२०००
२.	झगडा	रामचंद्र नलावडे	२००७
३.	वळंबा	शिवमूर्ती भांडेकर	२००७
४.	मी एक दगडफोड्या	बाबा वडार	२००७
५.	तिम्मा	प्रकाश जाधव	
६.	रक्तचंदन	रामचंद्र नलावडे	२०१५
७.	तीर्थरूप आईस	रामचंद्र नलावडे	२०१७
८.	वेदना	टी.एस.चव्हाण	२०१८
९.	मला शिकायचंय	दिलीप शिंदे	२०१८

परिशिष्ट (ब)

संदर्भग्रथ सूची

१. आत्रे त्रिंबक ना.	:	गुन्हेगार जाती
२. कऱ्हाडे डॉ.,सदा	:	'दलित साहित्य चिकित्सा'
३. कांबळे, उत्तम(संपा.)	:	'जागतिकीकरणाची अरिष्टे,
४. कुलकर्णी-कुसरे डॉ., आरती	:	'दलित स्वकथने',
५. केदार डॉ., रविंद्र		
ढोले डॉ., गोपाल (संपा.)	:	'दलित आत्मकथने चिंतन आणि चर्चा',
६. गायकवाड, लक्ष्मण	:	'हे स्वातंत्र्य कोणासाठी?'
७. गायकवाड डॉ.,संपत	:	'दलित आत्मकथने भाषिक समाज : भाषा आणि भाषाव्यवहार',
८. चव्हाण, रामनाथ	:	'भटक्या-विमुक्तांचे अंतरंग',
९. चौघुले वि.शं.	:	'आस्वाद आणि आलेख',
१०. जाधव, रा.ग.	:	'निळी पहाट'
११. जाधव डॉ.,मनोहर	:	'दलित स्त्रियांची आत्मकथने स्वरूप आणि चिकित्सा',
१२. जाधव डॉ., रमेश	:	'विमुक्तरंग'
१३. जाधव डॉ., रमेश	:	'भटक्या-विमुक्तांचे परिप्रेक्ष्य',
१४. टेकले डॉ., संग्राम	:	'मराठी ग्रामीण कादंबरी आस्वाद आणि समीक्षा', शौर्य
१५. पंदिलवाड डॉ.,द्रौपदी	:	'भटक्या विमुक्तांची आत्मकथने',

१६. लोंढे बबन,

गायकवाड सुधाकर : आंबेडकरी विचारधारा

१७. भगत, दत्ता : समकालीन साहित्य आणि साहित्यिक,

१८. मेश्राम डॉ., योगेंद्र : 'दलित साहित्य उद्‌गम आणि विकास'

१९. मनोहर डॉ., यशवंत : 'आंबेडकरवादी मराठी साहित्य,

२०. माने, लक्ष्मण : 'बंद दरवाजा

२१. मोकाशी डॉ., मधुकर : 'ग्रामीण-दलित साहित्य : चळवळ आणि समीक्षा

२२. मुलाटे, वासुदेव : 'सहा दलित आत्मकथने'

२३. मुद्‌दे, श्रीकांत (संपा.) : 'अंधारवाटा'

२४. मुद्‌दे, श्रीकांत (संपा.) : 'वडार समाज स्थिती आणि गती'

२५. लिंबाळे डॉ.,शरणकुमार : 'साहित्याचे निकष बदलावे लागतील

२६. लिंबाळे डॉ.,शरणकुमार : 'दलित आत्मकथा एक आकलन'

२७. लिंबाळे डॉ.,शरणकुमार : 'दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र'

२८. लिंबाळे डॉ.,शरणकुमार(संपा.) : 'भारतीय दलित साहित्य'

२९. लुलेकर डॉ.,प्रल्हाद जी. : वेदनांचा प्रदेश

३०. वडगबाळकर, सौ.श्रुती श्री. : 'मराठीतील स्त्री-आत्मचरित्रांचा सामाजिक अंगाने अभ्यास', (इ.स.१९१० ते १९९५)

३१. वष्ट, जयंत : 'मराठी चरित्र : रूप आणि इतिहास'

३२. विभुते प्रा.,शिवहार : 'मूठभर माती आकलन आणि अवलोकन'

३३. शिरसाठ डॉ.,शिवदास : 'दलित आत्मकथने : स्वरूप-संकल्पना व सौंदर्य

३४. सोनवणी, संजय : 'जातिसंस्थेचा इतिहास'

३५. सोलापुरे डॉ.,राजशेखर(संपा.) : 'महिला विकास प्रश्न-पैलू-प्रयास'

३६. हस्तक, उषा : 'मराठीतील आत्मचरित्रपर लेखन'

३७. प्रा.कांबळे कमलाकर : दलित साहित्य शोध आणि आस्वाद

टीप : सदरील संशोधन आराखड्यात संशोधनाला गती येईल त्याप्रमाणे आवश्यक ठिकाणी बदल होणे संभवनीय आहे.

मार्गदर्शक	**संशोधक**
प्राचार्य डॉ.आशा मुंडे	श्रीकांत मरगू मुद्दे